गट-ब (अराजपत्रित), गट क, गट-ड मधील
पदांवर सरळसेवा, पदोन्नती व प्रतिनियुक्तीने
नियुक्ती करण्यासंदर्भात विभागाच्या सचिवांना
"नियुक्ती प्राधिकारी" घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन आदेश क्रमांकः पदनि-१०१८/प्र.क्र. ८९ / आस्था-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीखः २८ फेब्रुवारी, २०१८

वाचा -

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय - क्रमांक-एसआरव्ही -२०१६/प्र.क्र.२९०/कार्या-१२, दि. १९.११.२०१६

प्रस्तावना -

शासकीय कर्मचाऱ्यांच्या संदर्भात त्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणूक/ पदस्थापना करतांना संबंधीत प्रकरणे कोणत्या स्तरापर्यन्त सादर करावी व कोणत्या स्तरावर अंतिम निर्णय घ्यावे याबाबत संदिग्धता दूर करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भांकित दिनांक १९.११.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील पदांसाठी संबंधीत विभागाचे सचिव/ विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णयः

गट-ब (अराजपत्रित) तसेच गट-क आणि गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने नेमणूका/ पदस्थापना करतांना संबंधीत प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यासाठी ग्राम विकास विभागासाठी खालील प्रमाणे पदनिहाय "नियुक्ती प्राधिकारी" घोषित करण्यात येत आहेत.

अ.क्र.	पदे	नियुक्ती प्राधिकारी
१	२	३
१	गट-ब) अराजपत्रित ,(गट-क आणि गट-ड	अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव

२. वरील नियुक्ती प्राधिकारी हे सरळसेवेने ,पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणूका / पदस्थापनेच्या प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी असतील मात्र बदली .करण्यासंदर्भात बदली अधिनियमान्वये घोषित केलेले सक्षम प्राधिकारी अंतिम निर्णय घेतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१८०२२८१०२५४५१५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prakash Nathlya Valvi

Digitally signed by Prakash Nathlya Valvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=37e23389b57a9e7ec7b19b76a580789713f16034880d23f1579f9f010c94459d, cn=Prakash Nathlya Valvi
Date: 2018.02.28 17:21:37 +05'30'

(प्र.ना.वळवी)
उप सचिव (आस्था-खुद्द)
ग्राम विकास विभाग.

प्रत-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. मुख्य सचिव,
५) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव
६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
७) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
८) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखापरीक्षा) महाराष्ट्र, मुंबई.
९) महालेखापाल, महाराष्ट्र -२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
१०) महालेखापाल, महाराष्ट्र -२ (लेखापरीक्षा) महाराष्ट्र, नागपूर.
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१३) सामान्य प्रशासन विभाग / कार्या-१२
१४) सचिव, (ग्रा.वि. व पं.रा.) , ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक,
१५) सचिव, (प्रमंग्रासयो) , ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक,
१६) सर्व अधिकारी,ग्राम विकास विभाग ,
१७) कक्ष अधिकारी, रोख शाखा/नों.शा./मा.तं.कक्ष/समन्वय कक्ष, ग्राम विकास विभाग
१८) निवडनस्ती आस्था-१, ग्राम विकास विभाग